بِسمِ اللّٰہِ الرَّحمٰنِ الرَّحِیمِ   نَحمَدُہٗ وَ نُصَلِّی عَلٰی رَسُولِہِ الکَرِیمِ   وَعَلٰی عَبدِہِ المَسِیحِ المَوعُود
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُولُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in   محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे पवित्र कुरआनची प्रतिष्ठा, स्थान, दर्जा आणि महानता यांचे वर्णन

**बांगलादेश,पाकिस्तान,बुर्किनाफासो आणि मध्यपूर्व देशाच्या अहमदींसाठी प्रार्थना करण्याचे उपदेश उपदेश**

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ३ मार्च २०२३, मशिद मुबारक, टिलफर्ड,

بِسمِ اللّٰہِ الرَّحمٰنِ الرَّحِیمِ۔ اَلحَمدُ لِلّٰہِ رَبِّ العٰلَمِینَ۔ الرَّحمٰنِ الرَّحِیمِ۔ مٰلِکِ یَومِ الدِّینِ۔ اِیَّاکَ نَعبُدُ وَاِیَّاکَ نَستَعِینُ۔ اِھدِنَا الصِّرَاطَ المُستَقِیمَ۔ صِرَاطَ الَّذِینَ اَنعَمتَ عَلَیھِم ۙ غَیرِ المَغضُوبِ عَلَیھِم وَلَا الضَّآلِّینَ۔

تشہد، تعوذ اور سورۃ الفاتحہ کی تلاوت کے بعد حضورِ انور ایدہ اللہ تعالیٰ بنصرہ العزیز نے فرمایا:

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी पवित्र कुरआनबद्दल जो ज्ञान आणि संपदा आम्हाला प्रदान केली आहे आणि त्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी जी पद्धत स्पष्ट केली आहे ते मी माझ्या मागील प्रवचनात सांगितले आहे. पवित्र कुरआन जो ब्रह्मज्ञानाचा खजिना आहे, वास्तविक पाहता हाच तो मार्ग आहे ज्याद्वारे परमेश्वराचे सन्निध्य प्राप्त होते. याशिवाय परमेश्वराचे सन्निध्य प्राप्त करण्याचा कोणताही मार्ग नाही. हजरत अपेक्षित मसीह एक ठिकाणी सांगतात कीः

''कुरआन खुदा नुमा आहे खुदा का कलाम है - बे इसकी मारफत का चमन नातमाम है. ''

(कुरआन ईश्वराचे रूप आणि त्याचे वचन आहे - त्याच्याशिवाय ज्ञानमार्ग अपूर्ण आहे)

हा तो महत्त्वपूर्ण घटक आहे जो नेहमी आपल्यासमोर ठेवणे आवश्यक आहे. जर आम्हाला परमेश्वराचे सान्निध्य आणि त्याची प्रसन्नता हवी असेल, तसेच इहलोक आणि परलोक सुशोभित करायचे असेल तर या गोष्टींना लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे. पवित्र कुरआनचा लाभ घेण्यासाठी अल्लाहने पाठवलेल्या मार्गदर्शकाची गरज आहे, जो या काळात पवित्र पैगंबर (स.) यांचे सच्चे गुलाम हजरत अपेक्षित मसीह व महदी आहेत. हजरत अपेक्षित मसीह यांनी पवित्र कुरआनच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकले आहे आणि त्याची सुंदरता आणि वैभव जगासमोर लेखणाच्या स्वरूपात प्रकट केली आहे. या संदर्भातच माझे दोन प्रवचन होते आणि पुढेही या संदर्भात मी त्यांचे वचन आणि लेखन प्रस्तूत करेन. आजही यालाच पुढे नेत, हजरत अपेक्षित मसीह यांच्या उद्धृत प्रस्तूत करेन ज्यामध्ये पवित्र कुरआनची वैशिष्ट्ये, दर्जा आणि महत्त्व यांचा उल्लेख आहे.

पवित्र कुरआन हे ईश्वराचे वचन आहे, असे स्पष्ट करून लाला भीम सेन यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात की, काही दिवसांपूर्वी माझ्याकडे लेखराम नावाचा एक ब्राह्मण जो आर्या होता कादियानमध्ये आला आणि म्हणाला की वेद हे ईश्वराचे वचन आहे. यावर हजरत म्हणाले की, पवित्र कुरआन हे ईश्वराचे वचन आहे कारण यात शिर्क (अनेकेश्वरवाद)किंवा इतर कोणतीही अशुद्ध शिकवण नाही. त्याचे पालन केल्याने जिवंत ईश्वराचे दर्शन होतात आणि चमत्कार प्रकट होतात.

अतः परमेश्वरीय वचन होण्याची अट अशी की, तो अनेकेश्वरापासून मुक्त असावा आणि असे केल्याने देवदर्शन प्राप्त व्हावा.

पवित्र कुरआनने देवाचा चेहरा दाखवण्यात (देवदर्शन) आपली भूमिका कशी पार पाडली हे सोबतींच्या जीवनाततून दिसून येते. पवित्र कुरआनाच्या शिकवणीचा सोबतींच्या जीवनावर काय परिणाम झाला याचे वर्णन करताना, अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, प्रेषित (स.) यांचा काळ जो इस्लामचा अत्योच्च काळ होता, या काळाचा व्यापक विचार केल्यास हे सिद्ध होते की प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या शिकवणुकींनी श्रद्धावंतांना सर्वात खालच्या स्तरावरून कसे उंच शिखरापर्यंत पोहोचवले. अल्लाहने त्यांना पवित्र आत्म्याने मदत केली. ते केवळ अशा स्तरावर राहिले नाही जिथे त्यांना त्यांचे दोष आणि पाप दिसले तर ते सदाचरणाकडे इतक्या वेगाने अग्रसर होऊ लागले की त्यांनी आपले उणीवांना बाहेर काढून सदाचारावर मार्गस्थ झाले. ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी त्यांनी अशा कठोर आणि घातक मार्गांचा अवलंब केला जो मानवसामर्थ्याची अत्योच्चपातळी आहे, आणि ते हे की त्यांनी आपल्या प्राणांना अर्पण करण्यात किंचितमात्रही परवाह केली नाही. शेवटी, ते स्वीकारले गेले आणि अल्लाहने त्यांच्या अंतःकरणाला पापमुक्त केले आणि त्यांच्यामध्ये सदवर्तनाचे प्रेम वाढवले. हा आहे पवित्र कुरआनाचा परणाम ज्याने त्यांना पृथ्वीच्या निरर्थक कणमात्रापासून आकाशातील चमकणारे तारे बनवले, आणि ज्यांच्याविषयी पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले की, त्यांच्यापैकी प्रत्येकजण तुमच्यासाठी मार्गदर्शक आहे.

पवित्र कुरआनचे पालन केल्याने, एक व्यक्ती सर्वशक्तिमान ईश्वराच्या गुणधर्मांचे नमूना होऊ शकते. या संदर्भात हजरत अपेक्षित (अ.स.) सांगतात: जो कोणी पवित्र कुरआनचे अनुयायी होऊन प्रेम आणि सत्यतेला पराकोटीला नेतो, तो ईश्वरीय गुणवैशिष्ट्यांचा एक प्रकारचा प्रकटीकरण बनतो. हे सर्व परिणाम या महान आणि वैशिष्ट्पूर्ण ग्रंथाचा आहे जो परमेश्वराच्या ग्रंथाच्या अध्ययनानंतर प्राप्त होतो. ते म्हणतात की,''मला पवित्र कुरआनमध्ये एक मोठी शक्ती जाणवली आहे, मला पवित्र प्रेषित मुहम्मद (स.) यांचे अनुसरण करताना एक विलक्षित वैशिष्ट्य माहित झाली आहे आणि ते म्हणजे त्यांचे खरे अनुयायी वली च्या स्थानापर्यंत पोहोचतात.''

पवित्र कुरआनच्या गुणांचे वर्णन करताना ते म्हणतात: पवित्र कुरआनचे चार चमत्कारी गुण आहेत. पहिला गुण म्हणजे पवित्र कुरआनचे वक्तृत्वशक्ति, जे मानवी वक्तृत्वापेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. दुसरा चमत्कार म्हणजे त्याने कथन केलेल्या कथा प्रत्यक्षात भविष्यवाण्या आहेत. तिसरा चमत्कारिक गुण म्हणजे पवित्र कुरआनच्या शिकवणीत मानवी स्वभावाला त्याच्या परिपूर्णतेपर्यंत आणण्यासाठी सर्व उपकरणे आहेत. चौथा महान चमत्कारिक गुण म्हणजे तो परिपूर्ण अनुसरण करणाऱ्याला सर्वशक्तिमान अल्लाहच्या इतक्या जवळ आणतो की त्याला संबोधन आणि संभाषण करण्याचा दर्जा प्राप्त होतो आणि प्रत्यक्षात त्याच्याहस्ते चिन्ह प्रकट होतात. ते म्हणाले की पवित्र कुरआन हा असा ग्रंथ आहे, ज्याचे अनुसरणामुळे प्रार्थना स्वीकारल्या जातात.

पवित्र कुरआनचा एक चमत्कारिक प्रभाव असा आहे की जे त्याचे पालन करतात त्यांना स्वीकृतीचा दर्जा मिळतो आणि त्यांच्या प्रार्थना स्वीकारून सर्वशक्तिमान अल्लाह त्याच्या मृदु आणि वैभवशाली शब्दांद्वारे त्यांना सूचित करतो आणि विशेषतः शत्रूंविरूद्ध त्यांची सहाय्यता करतो.

पवित्र कुरआनच्या प्रभावांबद्दल, हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात: परमेश्वराचा दर्जा आणि प्रतापचा विश्वास असा असावा की जो अज्ञानाचे पडदे दूर करुन आणि शरीरात थरथर पसरवतो आणि मृत्यू जवळ प्रकट करतो आणि हृदयावर एक असा तेज आणि भीती निर्माण व्हावी

ज्याने ऐहिक जीवन नाश होऊन मनुष्य अदृश्य हाताने देवाकडे खेचला जावे आणि त्याचे हृदय विश्वासाने भरून जावे की खरोखरच परमेश्वर आहे, जो धाडसी आणि उघडउघड गुन्हेगाराला शिक्षा झाल्याशिवाय सोडत नाही. मी सर्वांना जाहीर करतो की या गरजा पूर्ण करणारे ग्रंथ पवित्र कुरआन आहे. पवित्र कुरआनाचे पालन करणाऱ्या व्यक्तीला परमेश्वर स्वतः दर्शन देतो आणि त्याला दे-वस्थानाचे दर्शन देतो आणि मी (अस्तित्वात) आहे अशी प्रतिध्वनीद्वारे त्याच्या विश्वासात वृद्धी करतो.

या गोष्टीचे विवरण करत की पवित्र कुरआन हे अनेकेश्वरवादापासून मुक्तीचे साधन आहे हजरत अपेक्षित मसीह म्हणतातः पवित्र कुरआनने एकेश्वरवादाचे बीज अरबस्तान, पर्शिया, इजिप्त, सीरिया, भारत, चीन, अफगाणिस्तान, काश्मीर, या देशांमध्ये पेरले असून बहुतांश भागातून बहुदेववाद आणि सृष्टीवादाचे मूळ उपटले आहे, ही एक अभूतपूर्व कृती आहे ज्याचे उदाहरण जगात अन्यत्र आढळत नाही.

पवित्र कुरआनची शिकवण हे उच्च पातळीचे शिक्षण आहे. या संदर्भात हजरत अपेक्षित मसीह म्हणतातः तो ग्रंथ जो अत्यंत अंधकार आणि भरकटलेल्या परिस्थिततीत प्रकट झाला त्यात अत्योच्च शिकवण आणि मार्गदर्शन असणे आवश्यक होते. ज्यांची अंतःकरणे भ्रष्ट आणि अभद्र कृत्यांनी दूषित झाली होती, अशा लोकांच्या सुधारणेसाठी तो ग्रंथ अवतरित झाला.

पवित्र कुरआन हा वैश्विक ग्रंथ असल्याबद्दल हजरत अपेक्षित मसीह म्हणाले की, जेव्हा जगाच्या लोकसंख्येमध्ये माणसाची प्रगती झाली आणि भेटी-गाटीचे मार्ग मोकळा झाले आणि एका देशातील लोकांना दुसऱ्या देशातील लोकांशी भेटण्याची सोय झाली आणि हे ज्ञात झाले की जगाच्या अमुक अमुक ठिकाणी मानवजाती आहे आणि सर्वशक्तिमान अल्लाहने त्यांना पुन्हा एक राष्ट्रासारखे बनवायचे आणि विभाजनानंतर त्यांना एकत्र करायचे ठरवले, तेव्हा परमेश्वराने सर्वांसाठी एक पुस्तक पाठवले.

अपेक्षित मसीह (अ.स.) पवित्र कुरआनची चार कारणे सांगितली आहेत. ही कारणे कोणती? १. पहिले कारण, हे कोण करत आहे आणि त्याची कारणे काय आहेत. २. याची इतर बाह्य आणि व्यावहारिक कारणे कोणती? ३. याचे भौतिक कारण काय आहे? ४. अत्यंत आवश्यक कारण की याच्या अस्तित्वामागचा मूळ कारण आणि उद्देश काय आहे? पहिले कारण असे की, الٓمّٓ-اَنَا اللّٰہُ اَعۡلَمُ मी अल्लाह आहे. सर्वज्ञ. या पुस्तकाचे भौतिक कारण असे आहे की हे पुस्तक सर्वशक्तिमान अल्लाहकडून आले आहे, ذٰلِکَ الۡکِتٰبُ ज्याला सर्वात जास्त ज्ञान आहे आणि त्याचे अनुसरण करून खरे फायदे मिळू शकतात. प्रत्यक्ष कारण असे की, لَا رَیۡبَ فِیۡہِ कारण या पुस्तकाचे वैशिष्ट आणि गुण हे आहे की यामध्ये कोणत्याही प्रकारचे संदेह किंवा शंका नाही. जे सांगितले जाते ते स्थिर असते आणि जे दावा केले जाते ते तर्कसंगत आणि स्पष्ट असते. या पुस्तकाचे मुख्य कारण आणि गाभा هُدًی لِّلۡمُتَّقِیۡنَ आहे अर्थात याचे उद्देश सदाचारींचे मार्गदर्शन करणे आहे.

हुजूर अनवर म्हणाले की, आजच्या तथाकथित मौलवींनी कुरआनातील कालातीत शिकवण अशा रंगात मांडली आहेत की, विरोधकांना त्यावर आक्षेप घेण्याची संधी मिळाली आहे. म्हणून आज सर्व अहमदींची ही जबाबदारी आहे की त्यांनी आपल्या उक्ती आणि कृतीद्वारे पवित्र कुरआन चे खरे दर्शन जगाला करून द्यावे आणि त्यासाठी सदाचरणाच्या मार्गावर नेहमी टिकून राहणे आणि

पवित्र कुरआननुरुप वर्तन करणे आवश्यक आहे. आणि असे करून जगासमोर हे सिद्ध करावे की सर्व रोगांचा उपाय पवित्र कुरआन मध्ये आहे. अल्लाह आम्हाला सदाचरणाचे पालन करत पवित्र कुरआनच्या शिकवणूकीनुसार जीवन व्यतित करण्याचे सामर्थ्य देवो. आमीन.

प्रवचनाच्या शेवटी, हुजूर अनवर यांनी बांगलादेश, पाकिस्तान, बुर्किना फासो आणि अल्जीरियाच्या अहमदींसाठी प्रार्थना करण्यास सांगितले. पुढे हजरत अन्वर म्हणाले:

आता मी तुम्हाला खास प्रार्थना करण्याचे उपदेश करू इच्छितो. बांगलादेश मध्ये आज जलसा सालाना आयोजित करण्यात आला आहे. आणि आजच त्यांचा पहिला दिन होता परंतु विरोधकांनी सभास्थळावर हल्ला केला आणि अनेक जण जखमीही झाले आहेत. आतापर्यंत आलेल्या बातम्यांनुसार, त्यांनी अशाप्रकारे हल्ला केला आहे की काही जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच सभोवतालच्या भागातील अहमदियांची घरेही जाळत आहेत. किती नुकसान झाले याचा अंदाज अद्याप आलेला नाही. अल्लाह अहमदियांचे रक्षण करो आणि विरोधकांचे लवकरच पकड होवो. त्यांच्यासाठी कोणतेही मार्गदर्शनाची प्रार्थना अंतःकरणातून येत नाही. केवळ हीच प्रार्थना येते की, **اَللّٰهُمَّ مَزِّقْهُمْ كُلَّ مُمَزَّقٍ وَ سَحِّقْهُمْ تَسْحِيْقًا** हे अल्लह अत्याचार करणाऱ्यांना त्यांचा मोबदला दे आणि त्यांचा सर्वनाश कर.

त्याचप्रमाणे पाकिस्तानातील दुर्गम परिस्थितीसाठी देखील प्रार्थना करा. अल्लाह अहमदींचे जीवन तिथे सुलभ करू दे. बुर्किना फासोमध्ये अजूनही परिस्थिती चांगली नाही, त्यांच्यासाठी देखील प्रार्थना करा. त्याचप्रमाणे मध्यपूर्व देशात राहणाऱ्या अहमदींसाठीही प्रार्थना करा; चूकीचे खटले चालवून त्यांना त्रास दिले जात आहे. अल्लाह सर्वत्र अहमदींना आपल्या सुरक्षेत ठेवो.

बांगलादेशात, मी म्हटल्याप्रमाणे, प्रशासनाने आम्हाला काळजी करू नका, तुम्ही तुमचे वार्षिक सम्मेलन करा आणि आम्ही पूर्ण संरक्षण करू असे आश्वासन देण्यात आले होते. पण जेव्हा दंगलखोर, अतिरेकी आणि मौलवी आपली टोळी घेऊन आली तेव्हा पोलीस सुरक्षा प्रेक्षक बनून तिथे उभी होती. तथापि, आम्ही फक्त सर्वशक्तिमान अल्लाहसमक्ष शरण जातो आणि त्यालाच विनवणी करतो. अल्लाह आमच्या बांधवांना सर्व अत्याचारापासून सुरक्षित ठेवो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ.
عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ
لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ۔